# श्री विसर्जनासाठी मनपाची यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी

**नांदेड :** श्री विसर्जनासाठी मनपाची यंत्रणा सज्ज असून ठिकठिकाणी असलेल्या विसर्जन स्थळावर गणेश मंडळांना मदतीसाठी महापालिकेने आपले अधिकारी तैनात केले आहेत.

निर्माल्य संकलनासाठी नगिनाघाट, गोवर्धनघाट, शनिघाट, नावघाट, आसनापूल सांगवी व आसनापूल पासदगाव या पाच ठिकाणी प्रत्येकी एक ट्रॅक्टर, ५ मजूर अशी व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील गणेश मंडळांच्या जवळपास ७५ टक्के श्री मूर्तींचे विसर्जन नगिनाघाट भागात होते. त्या ठिकाणी मनपाचे व्यासपीठ, ध्वनीक्षेपक व अधिकारी तळ ठोकून राहणार आहेत. श्री विसर्जनासाठी एक क्रेन, १५ जीवरक्षक, ३ तराफ, २ स्वच्छता निरीक्षक अशी व्यवस्था राहणार आहे. संतदासगणु घाट येथे मोठ्या श्री मुर्तीसाठी क्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील सर्व मंडळांनी १० फुटापेक्षा अधिक उंचीच्या श्रीमूर्ती याच ठिकाणी विसर्जनासाठी आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. या घाटावर पुलापासून खालच्या ठिकाणी श्रीमूर्ती डोक्यावर उचलून किंवा रॅम्पद्वारे न्याव्या लागणार आहेत. त्याकरिता कोणतेही वाहन खाली जाऊ दिल्या जाणार नाही. पासदगाव, आसना नदीत पाणी साठवून ठेवण्यासाठी कोल्हापूरी बंधाऱ्याचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत.

महापालिकेतर्फे सर्व गणेश मंडळांचे स्वागत करण्यासाठी वजिराबादच्या मुथा चौकात व्यासपीठ उभारले जाणार आहे. मुख्य इमारतीत एक तर पोलिसांच्या ताब्यात एक असे अग्नीशमण दलाचे दोन बंब तैनात ठेवण्यात आले आहेत. पंचवटी हनुमान मंदिर, नगिनाघाट, मुथाचौक या तीन ठिकाणी मनपाचे पाण्याचे टँकर कार्यान्वीत करण्यात येणार आहे. महापालिकेच्या उपायुक्त व सहा.आयुक्तांना विविध विसर्जनस्थळाचे नियंत्रण अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. निर्माल्य संकलनासाठी एमजीएम महाविद्यालयातील विद्यार्थी महापालिकेला मदत करतील. संत दासगणु नावघाटावर १०, शनिघाटावर ५, गोवर्धन घाटावर ५, आसनापुल सांगवी येथे ५ तर आसनापुल पासदगाव येथे २ जीवरक्षक जवानांची नेमणूक करण्यात आली आहे.